॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

✲ सुविचार ✲
एक चागंली माता
शंभर शिक्षकांच्या मोलाची असते.

अहिल्यानगर ■ सोमवार, दि. १५ जून २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १५ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com


## फोडणी


राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४


### झुंडशाही

प्रश्न विचारणे म्हणजे
ठरतो आहे का गुन्हा
व्यवस्था म्हणून विचार
करावाच लागेल पुन्हा
या विकृत झुंडशाहीला
लगाम घालायचा कोणी
राजाश्रयाने उन्मत्त झाले
आतले बाहेरचे दोन्ही

## SPOT NEWS

### जेजुरी गडावर सोमवती अमावस्यानिमित्त गर्दी

● **जेजुरी** – अवघ्या महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या तीर्थक्षेत्र जेजुरीत सोमवती अमावस्यानिमित्त प्रचंड गर्दी केली होती. सुमारे तीन लाखाहून अधिक भाविकांनी कुलदैवत खंडोबाचे दर्शन घेतले. दीड वर्षानंतर जेजुरीत सोमवती यात्रा भरत असल्याने भाविकांची गर्दी झाली होती. रविवारी १५ जून रोजी दुपारी १२.२० वाजेपासून अमावस्या सूरु झाली होती. ती आज सोमवारी सकाळी ८.२४ वाजेपर्यंत सोमवती अमावसेचा पर्व काळ असल्यामुळे ग्रामस्थानी रविवारी मध्यरात्रीनंतर दोन वाजता पालखी सोहळा कऱ्हा स्नानासाठी काढण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार रात्री दोन वाजता मानकरी पेशवे यांच्या इशारतीत सोहळ्याने कऱ्हा नदीकडे प्रस्थान ठेवले. पालखीचे खांदेकरी मानकरी आणि ग्रामस्थांनी सदानंदाचा येळकोट, येळकोट येळकोट जय मल्हार च्या जयघोषात पालखी उचलली. यावेळी उपस्थित भाविकांनी भंडार खोबऱ्याची मुक्त हस्ताने उधळण केली. देवाचा जयघोष आणि भंडार खोबऱ्याच्या उधळणीत पालखी मुख्य मंदिराला प्रदक्षिणा घालीत बालदारीत नेण्यात आली.

### मंत्री महाजनांच्या शिष्टाईने आ. पवार यांचे अन्नत्याग आंदोलन स्थगित

● **पंढरपूर** – शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांचे गेल्या ३ दिवसांपासून पंढरपूरमध्ये अन्नत्याग आंदोलन सुरू होते. आज मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत रोहित पवारांनी तूर्त उपोषण मागे घेतले. महाजनांच्या शिष्टाईला आज यश आले. २२ जूनच्या आधी मुंबईत बैठक होणार आहे. मुख्यमंत्र्यांनी चर्चेसाठी बोलावल्याची माहिती रोहित पवार यांनी दिली. आपल्या मागण्यांसंदर्भात सरकार सकारात्मक आहे. शेतक-यांना न्याय देण्याचा विचार केला जात आहे. जर आमच्या मागण्या मान्य न झाल्यास पुन्हा ४ जुलैला शेतक-यांच्या वतीने मराठवाड्यात मोठे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आमदार रोहित पवार यांनी दिला. यावेळी रोहित पवार यांनी कर्जमाफी योजनेला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव दिल्याबद्दल महाजन यांचे अभिनंदन केले. सरकारने काढलेला जीआर महत्वाचा आहे.

# धरणातील पाणी पिण्यासाठी आरक्षित

## राज्यातील अपुऱ्या पर्जन्यमानाच्या पार्श्वभूमीवर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा निर्णय



● **पुणे । वीरभूमी–**

राज्यातील अपुऱ्या पर्जन्यमानाच्या पार्श्वभूमीवर तसेच धरणातील उपलब्ध पाणीसाठा विचारात घेवून ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत नागरीकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करण्यास सर्वौच्च प्राधान्य देण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहे. बेकायदेशिर पाणी उपश्यावरही तातडीने कडक कारवाई करण्याच्या सुचना त्यांनी विभागाच्या आधिकाऱ्यांना दिल्या.

सिंचन भवनामध्ये जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत कृष्णा व गोदावरी लाभक्षेत्राच्या अंतर्गत येणा-या धरणांमधील पाणीसाठा, अगामी मान्सुनची परिस्थिती या संदर्भात महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीला कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक हनमंत धुमाळ, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयवंत गवळी यांच्यासह मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

सद्य परिस्थितीत राज्यातील धरणांमधील एकुण उपयुक्त जलसाठा ३५७.५ टिएमसी (२५ टक्के) असून, तो गतवर्षीच्या तुलनेत कमी असल्याचे निदर्शनास आले. यावर्षीचे पर्जन्यमान आता पर्यंत अत्यल्प झाल्यामुळे धरणात पाणी आले नाही हे त्यामागील प्रमुख कारण आहे. विशेषत: पुणे विभागातील उपयुक्त जलसाठा गतवर्षीच्या तुलनेक कमी असल्याने परिस्थिती गांभिर्याने हाताळावी असे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत दिले.

पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगर क्षेत्रातील सुमारे ८५ लाख नागरीकांना ३१ ऑगस्टपर्यंत पिण्याचे पाणी उपलब्ध राहण्यासाठी आवश्यक असलेले पाणी राखीव ठेवण्याच्या सुचना या बैठकीत मंत्र्यांनी प्राधान्याने दिल्या आहेत. मराठावाडा आणि कृष्णा महामंडळाच्या अंतर्गत येणारे सर्व धरणं, जलाशय व प्रमुख जलस्त्रोतांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा तातडीने आढावा घ्यावा, त्यावर अवलंबून असलेल्या लोकसंख्येचा विचार करुन पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक राखीव कोटा निश्चित करण्याबाबतही बैठकीत जलसंपदा मंत्र्यानी सुचित केले. जलसंपदा विभाग, जिल्हाधिकारी, महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि पाणीपुरवठा यंत्रणा यांच्यात प्रभावी समन्वय ठेवून पाणी व्यवस्थापनाचा कृती आराखडा तातडीने तयार करण्याचे निश्चित करण्यात आले.

नाशिक, अहिल्यानगर व मराठवाडा विभागातील जलसाठ्याचा आढावा घेताना नाशिक विभागात सध्या २६ टक्के तर मराठवाडा विभागात २८ टक्के उपयुक्त जलसाठा उपलब्ध असून, दोन्हीही विभागातील प्रकल्पांमध्ये अपेक्षित प्रमाणात पावसाची नोंद झालेली नाही. विशेषत: मराठवाडा आणि अहिल्यानगर विभागात पिण्याच्या पाण्याच्या गरजांना प्राधान्य देवून उपलब्ध जलसाठ्याचे काटेकारपणे नियोजन करण्याबातही गांभिर्याने कार्यवाही करण्यास आधिकाऱ्यांना सांगण्यात आले आहे.

नाशिक, अहिल्यानगर, पुणे, मराठवाडा विभागातील जलशयांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याची नवीन आवक सुरु होईपर्यंत असलेल्या पाण्याचा वापर अत्यंत जपून करावा. अगामी मान्सुनच्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करतानाच पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ग्रामीण व शहरी भागातील टंचाई निवारण आणि जलस्त्रोतांचे संरक्षण करण्यावर भर देण्याबातही बैठकीत ठरविण्यात आले. अहिल्यानगर जिल्ह्यासह गोदावरी खोऱ्यातील विविध प्रकल्पांची स्थिती लक्षात घेता स्थानिक प्रशासन, जलसंपदा विभाग व पाणीपुरवठा यंत्रणांनी समन्वयाने काम करुन पाण्याचे नियोजन करावे, उपलब्ध जलसाठ्याचा वापर अत्यावश्यक गरजांसाठी करण्याबाबत जनजागृती करण्याचे आवाहनही मंत्री विखे पाटील यांनी या बैठकीत आधिकाऱ्यांना केले आहे. उपलब्ध पाण्याचा वापर सर्वप्रथम पिण्यासाठी करण्यात यावा, बेकायदेशिर पाणी उपसा रोखण्यासाठी विशेष माहीम राबवण्यासाठी महसूल, पोलिस आणि जलसंपदा विभाग यांच्या संयुक्त पथकांमार्फत कठोर करावाई करण्याबाबतही स्पष्ट आदेश मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत दिले आहेत.

## राज्य फेडरेशनच्या अध्यक्षपदी दीपक पटवर्धन; कार्यकारी अध्यक्षपदी काका कोयटे





● **कोपरगाव । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष पदी रत्नागिरी येथील श्री स्वामी स्वरूपानंद नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष दीपक पटवर्धन यांची , तर अहिल्यानगर जिल्ह्यातील समता पतसंस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांची कार्यकारी अध्यक्ष (वर्किंग प्रेसिडेंट) पदी एकमताने निवड करण्यात आली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन संचालक वासुदेव काळे यांनी दिली.

पुणे येथे १२ जून २०२६ रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक सतीश मराठे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

बैठकीदरम्यान राज्यभरातील संचालकांनी काका कोयटे यांच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा विश्वास व्यक्त करत त्यांनी अध्यक्षपदाची धुरा स्वीकारावी, अशी आग्रही विनंती केली. मात्र वाढते वय, संस्थात्मक जबाबदाऱ्या, शैक्षणिक उपक्रम, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज यांचा उल्लेख करत कोयटे यांनी अध्यक्षपद स्वीकारण्यास विनम्र नकार दिला.

यानंतर सर्वानुमते दीपक पटवर्धन यांची अध्यक्षपदी एक मताने निवड करण्यात आली. निवडीनंतर पटवर्धन यांनी स्वत: पुढाकार घेत काका कोयटे यांनी कार्यकारी अध्यक्ष म्हणून संघटनेत सक्रिय राहावे, अशी विनंती केली. संचालक मंडळाने या प्रस्तावाला एकमुखी पाठिंबा देत कोयटे यांची कार्यकारी अध्यक्ष (वर्किंग प्रेसिडेंट) पदी निवड केली.

विशेष म्हणजे अध्यक्षपदासाठी यवतमाळचे राजूदास जाधव, नाशिकच्या ॲड. अंजलीताई पाटील, साताऱ्याचे डॉ. रवींद्र भोसले आणि सांगलीचे शशिकांत राजोबा हे इच्छुक होते. मात्र सहकार चळवळीच्या व्यापक हितासाठी सर्वांनी माघार घेत दीपक पटवर्धन यांच्या निवडीला एकमताने मान्यता दिली.

निवडीनंतर बोलताना अध्यक्ष दीपक पटवर्धन म्हणाले, काका कोयटे यांचा पतसंस्था चळवळीतील प्रदीर्घ अनुभव, राज्यभरातील व्यापक संपर्क आणि पतसंस्थांमधील लोकप्रियता लक्षात घेता त्यांचे मार्गदर्शन राज्य फेडरेशनसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्यांनी कार्यकारी अध्यक्ष (वर्किंग प्रेसिडेंट) म्हणून कार्यरत राहण्याबरोबरच आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिनिधित्वही कायम ठेवावे, असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला आहे.

दीपक पटवर्धन हे गेल्या १५ वर्षांपासून रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक असून महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण महामंडळाचेही दीर्घकाळ संचालक राहिले आहेत. रत्नागिरीतील दोनशे वर्षांची परंपरा असलेल्या नगर वाचनालयाचे आणि श्री स्वामी स्वरूपानंद नागरी सहकारी पतसंस्थेचे ते अध्यक्ष आहेत. तसेच रत्नागिरी जिल्हा भाजपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली असून सहकार क्षेत्रातील कायदेतज्ज्ञ म्हणून त्यांची राज्यभर ओळख आहे.

तसेच काका कोयटे हे महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे संस्थापक सदस्य असून सहसचिव, महासचिव तसेच डिपॉझिट गॅरंटी कॉर्पोरेशनचे अध्यक्ष म्हणून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. सहकार क्षेत्रातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव आणि तळागाळातील कार्यकर्त्यांशी असलेला थेट संपर्क लक्षात घेता पतसंस्था चळवळीसाठी त्यांचे योगदान आजही अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत संचालकांनी व्यक्त केले.

कायद्याचे सखोल ज्ञान असलेले दीपक पटवर्धन आणि प्रत्यक्ष क्षेत्रात कार्यरत राहून चळवळ उभारणारे काका कोयटे यांची जोडी राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करेल, असा विश्वास संचालक मंडळाने व्यक्त केला.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक सतीश मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत सर्व संचालकांची मते जाणून घेत पदाधिकाऱ्यांच्या निवडीचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

### पटवर्धन-कोयटे यांची जोडी प्रभावी ठरेल

■ काका कोयटे यांनी काही प्रमाणात का होईना राज्यातील सहकारी पतसंस्था चळवळीची जबाबदारी स्वीकारल्यामुळे राज्यभरातील सहकारी पतसंस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सहकार क्षेत्रातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव, नेतृत्व आणि मार्गदर्शन यांचा लाभ पुढेही चळवळीला मिळणार असल्याने पतसंस्था पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. त्याचबरोबर कायदेतज्ज्ञ दीपक पटवर्धन आणि अनुभवी सहकार नेते काका कोयटे यांची जोडी राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रभावी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## स्टँडर्ड चार्टर्ड बँकेच्या सामाजिक उपक्रमांचा महाराष्ट्रातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना लाभ

● **मुंबई । वीरभूमी–**

स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने गेल्या सात वर्षांत महाराष्ट्रात जलसुरक्षा, आरोग्यसेवा, रोजगारनिर्मिती आणि हवामान बदलाला तोंड देण्याच्या क्षमतेच्या विकासासाठी राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा राज्यातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना थेट लाभ झाला आहे. या उपक्रमांमुळे राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य शासन आणि खासगी क्षेत्र यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे विकासाचे फायदे समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचत आहेत. जलसंवर्धन, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण आणि आरोग्यसेवा या क्षेत्रांत स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने केलेले कार्य राज्याच्या विकास उद्दिष्टांना पूरक ठरत आहे. बँकेच्या विविध सामाजिक उपक्रमांच्या लाभार्थ्यांमध्ये महिलांचे प्रमाण ५२ टक्क्यांहून अधिक असून, जलसंधारण, आरोग्यसेवा आणि उपजीविका वृद्धी या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमध्ये; तसेच राज्यातील ७५ टक्के आकांक्षी जिल्ह्यांमध्ये हे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले आहेत.

जलसुरक्षा उपक्रमांतर्गत १.०६ अब्ज लीटर गोड्या पाण्याची साठवण क्षमता निर्माण करण्यात आली असून, दुष्काळग्रस्त भागांमध्ये ४५ वॉटर एटीएमची स्थापना करण्यात आली आहे. मराठवाडा आणि विदर्भातील गावांसह राज्यातील २७१ गावांमध्ये जलसुरक्षा मजबूत करण्यात आली आहे; तसेच ८ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना जलसंवर्धन उपाययोजना आणि हवामान-सुसंगत शेती तंत्रज्ञानासाठी मदत करण्यात आली आहे. हवामान बदलाचे परिणाम कमी करण्याच्या दिशेने ७ लाख वृक्षांची लागवड हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. रोजगारक्षमतेच्या क्षेत्रात ६ हजार ५९८ युवकांना कौशल्य विकास आणि रोजगार प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यापैकी ६३ टक्के युवकांना रोजगार मिळाला आहे. इलेक्ट्रिक वाहने, वाहन उद्योग, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स, बँकिंग आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. लाभार्थ्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न १.६६ लाख रुपये इतके नोंदविण्यात आले आहे. या कार्यक्रमातील ६१ टक्के लाभार्थी महिला असून, ग्रामीण भागातील महिला उद्योजिकांना विशेष आर्थिक सहाय्य पुरविण्यात आले आहे.

# राहुरीतील सुरक्षा रक्षक श्रीकांत दोंदे हत्याप्रकरणी विद्यापीठ प्रवेशद्वारावर ठिय्या

## उच्चस्तरीय चौकशी, दोषींवर कठोर कारवाई । कुटुंबाला नुकसानभरपाई व नोकरीची मागणी

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत असलेल्या मागासवर्गीय दलित कुटुंबातील श्रीकांत पोपट दोंदे यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी संपूर्ण घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच पीडित कुटुंबाला नुकसानभरपाई व पुनर्वसन देण्यात यावे, या प्रमुख मागण्यांसाठी शिवसेना सामाजिक न्याय विभागाच्या वतीने विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

जिल्हाध्यक्ष विनोद साळवे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात जिल्हा सचिव विजय लोंढे, महिला जिल्हाप्रमुख कावेरी भिंगारदिवे यांच्यासह पँथरचे चंद्रकांत जगधणे, राजेंद्र पाटोळे, पोपट दोंदे, दिलीप निकाळे, कृष्णा कांबळे, प्रियंका कदम, अशोक दोंदे, विक्रम दोंदे, भाऊसाहेब पंडित आदींसह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

श्रीकांत दोंदे हे महात्मा फुले कृषी विद्यापीठात सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत होते. २ जून २०२६ रोजी कर्तव्य बजावत असताना त्यांची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली असून, या हत्येमागील सर्व पैलूंचा निष्पक्ष आणि सखोल तपास करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. सध्या सुरू असलेला तपास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वर्ग करून स्वतंत्र आणि निष्पक्ष यंत्रणेमार्फत चौकशी करण्यात यावी, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली.

यावेळी विद्यापीठ प्रशासनाच्या सुरक्षाविषयक व्यवस्थेवरही गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले. श्रीकांत दोंदे ज्या ठिकाणी कार्यरत होते त्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा अभाव, अपुरी प्रकाशयोजना, सुरक्षारक्षकांना आवश्यक सुरक्षा साहित्य न देणे तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून नियमित पाहणी न होणे यासारख्या गंभीर त्रुटी असल्याचा आरोप करण्यात आला. या निष्काळजीपणामुळेच दोंदे यांना जीव गमवावा लागल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला.

त्यामुळे सुरक्षा अधिकारी तसेच संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांची सीआयडीमार्फत चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करावे आणि त्यांना या प्रकरणात सहआरोपी करण्यात यावे, अशी ठाम मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. श्रीकांत दोंदे हे आपल्या कुटुंबाचे प्रमुख आधारस्तंभ होते. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे कुटुंबावर आर्थिक आणि मानसिक संकट कोसळले आहे. त्यामुळे शासन आणि विद्यापीठ प्रशासनाने तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी. तसेच कुटुंबातील एका पात्र सदस्याला विद्यापीठ किंवा सरकारी सेवेत नोकरी देऊन पुनर्वसन करावे, अशीही मागणी करण्यात आली.

या प्रकरणात अटक करण्यात आलेले आरोपी सराईत गुन्हेगार असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. आरोपींवर यापूर्वी चोरी, खून यांसारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे नमूद करत त्यांच्यावर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (ट्रॉसिटी क्ट) गुन्हे दाखल करून त्यांना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. पीडित कुटुंबाला लवकर न्याय मिळावा यासाठी या प्रकरणाची सुनावणी जलदगती न्यायालयात



करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. याशिवाय महात्मा फुले कृषी विद्यापीठात रोजनदारीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याची मागणीदेखील आंदोलनातून करण्यात आली.

दरम्यान, आंदोलनाची दखल घेत महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या सुरक्षा कार्यालयाने लेखी आश्वासन दिले. कै. श्रीकांत दोंदे यांच्या कुटुंबाला देण्यात येणाऱ्या विमा रकमेबाबत आवश्यक कागदपत्रे, म्हणजे मृत्यूचा दाखला, शवविच्छेदन अहवाल आणि वारस दाखला प्राप्त होताच मजूर पुरवठा करणाऱ्या ठेकेदारामार्फत पुढील कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले. या लेखी आश्वासनानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. मात्र, येत्या आठ दिवसांत मागण्यांबाबत ठोस निर्णय न झाल्यास २३ जून रोजी नगर-मनमाड महामार्गावर रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिवसेना सामाजिक न्याय विभागाच्या वतीने विनोद साळवे यांनी दिला आहे.

# राशीन येथील काशीविश्वेश्वर मंदिर व बारव शिलालेख

## सामाजिक गरज, धार्मिक पुण्यकर्म म्हणून बांधली बारव

■ **विजय उंडे**

● **श्रीगोंदा । वीरभूमी** –

अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मौजे राशीन येथील काशीविश्वेश्वर मंदिर परिसरात दोन शिलालेख आहेत. पहिला लेख काशीविश्वेश्वर मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या एका खांबावर कोरलेला असून तीन ओळींचा उठाव स्वरूपाचा आहे.दुसरा लेख हा मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या बाहेर समोर एका चौकोनी आकाराच्या बारवेवरील कमानीच्या मध्यभागी कोरलेला आहे. सदर शिलालेख हा उठाव स्वरूपाचा असून पाच ओळींचा देवनागरी लिपीतील मराठी भाषेत कोरलेला आहे. लेख अनेक वर्ष उघड्यावर असल्याने त्यावर वातावरणाचा परिणाम झाला असून लेखातील काही अक्षरे पुसट झाली आहेत. लेखाचा छाप घेतला असता त्यावरील मजकूर स्पष्टपणे सहज वाचता येतो.

**काशी विश्वेश्वर मंदिर लेखवाचन**

**१. ॥ श्री विश्वनाथ चर ॥**
**२. ॥ णी तत्पर भुजंग ॥**
**३. ॥ अपा सेटे निरंतर ॥**

**बारवेवरील शिलालेख वाचन**

१. श्री विश्वनाथ चरणी तत्पर
२. भुजंगअपा सेटे कसबे रा
३.शीन निरंतर ॥ शके १६९३
४. खरनाम संवत्सरे श्रावण शुद
५. त्रयोदशी शुक्रवार

शिलालेखाचे वाचक : अनिल किसन दुधाणे, अनिकेत रजपूत

**अर्थ** : श्री विश्वनाथाच्या चरणी सदैव भक्तिभावाने तत्पर असलेले कसबे राशीन येथील भुजंगअपा सेटे यांनी शके १६९३, खरनाम संवत्सर, श्रावण शुद्ध त्रयोदशी, म्हणजेच २३ ऑगस्ट १७७१ शुक्रवार या दिवशी ही विहीर बांधली किंवा तिचे कार्य पूर्ण केले.

**शिलालेखाचे महत्व**

शिलालेखाच्या प्रारंभी आलेला श्री विश्वनाथ चरणी तत्पर हा उल्लेख भुजंगअपा सेटे यांची भगवान विश्वनाथावरील निष्ठा आणि भक्तिभाव व्यक्त करतो. यावरून विहीर बांधण्यासारखी सार्वजनिक कामे केवळ सामाजिक गरज म्हणून नव्हे, तर धार्मिक पुण्यकर्म म्हणूनही केली जात असल्याचे दिसून येते.

भुजंगअपा सेटे यांचा स्पष्ट उल्लेख असल्याने या कार्याचे श्रेय कोणाला जाते हे निश्चितपणे समजते. त्यामुळे त्या काळातील स्थानिक प्रतिष्ठित व्यक्ती, त्यांची सामाजिक भूमिका आणि लोकहितासाठीचे योगदान यांचा मागोवा घेण्यास मदत होते. अशा शिलालेखांमुळे स्थानिक इतिहासातील व्यक्तींची नावे जतन होतात.कसबे राशीन या उल्लेखामुळे राशीन हे त्या काळात महत्त्वाचे वस्तीस्थान किंवा प्रशासकीय केंद्र होते, याची माहिती मिळते. कसबे हा शब्द बाजारपेठ किंवा प्रमुख गाव यासाठी वापरला जात असल्याने राशीनच्या ऐतिहासिक स्थानाचे महत्त्व अधोरेखित होते. विहीर ही त्या काळातील पाणीपुरवठ्याचे प्रमुख साधन होती. त्यामुळे हा शिलालेख जलसंवर्धन व जलव्यवस्थापनाच्या परंपरेचा पुरावा म्हणूनही महत्त्वाचा आहे. लोकांच्या दैनंदिन गरजा, शेती, पशुपालन आणि प्रवाशांच्या सोयीसाठी अशा विहिरी अत्यंत आवश्यक होत्या. त्यामुळे विहीर बांधणे हे लोककल्याणकारी कार्य मानले जात असे.





या लेखात दिलेली शके, संवत्सर, महिना, तिथी आणि वार यांची नोंद कालगणनेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे शिलालेखाची अचूक तारीख निश्चित करता येते आणि त्या काळातील घटनांचा कालक्रम मांडण्यास मदत होते.

एकूणच, हा शिलालेख धार्मिक श्रद्धा, लोकहितकारी दानपरंपरा, जलव्यवस्थापन, स्थानिक सामाजिक नेतृत्व आणि अठराव्या शतकातील राशीनच्या इतिहासावर प्रकाश टाकणारा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक दस्तऐवज आहे. तो तत्कालीन समाजाच्या धार्मिक आणि सार्वजनिक जीवनातील परस्परसंबंध स्पष्टपणे दर्शवितो.

सदर शिलालेख छाप, फोटो, संशोधन कार्यात शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन संचालित शिवदुर्ग वारसा संवर्धन समितीचे राजेश इंगळे, दिगंबर भुजबळ आणि राशीन येथील शेटे परिवार यांचे सहकार्य लाभले.

---

# SPOT NEWS



## भाषासंवर्धन समितीच्या राज्य उपाध्यक्षपदी प्राचार्य देविदास सोनटक्के यांची निवड

● **पाथर्डी । वीरभूमी** –

मराठी राजभाषा संवर्धन समिती प्रतिष्ठान अहिल्यानगर या महाराष्ट्र राज्य क्षेत्र असलेल्या संस्थेच्या राज्य उपाध्यक्षपदी टाकळीमानुर येथील श्री भवानीमाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य देविदास सोनटक्के यांची निवड करण्यात आली या निवडीमुळे अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेचे अध्यक्ष रा. ह. दरे, उपाध्यक्ष डॉक्टर विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे, सह सचिव मुकेश मुळे व खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे यांनी सोनटक्के यांचे अभिनंदन केले. तसेच मराठी राजभाषा संवर्धन समिती प्रतिष्ठानचे संस्थापक अमोल क्षीरसागर व अध्यक्षा सौ सुलोचना क्षीरसागर यांनी देखील प्राचार्य सोनटक्के यांचे अभिनंदन केले आहे. मराठी राजभाषेचा प्रचार प्रसार व भाषेची गोडी वाढविण्यासाठी जोमाने काम करण्याची जबाबदारी यशस्वीरित्या पूर्ण करण्याची भावना सोनटक्के यांनी व्यक्त केली. विद्यालयाचे पर्यवेक्षक वैरागर सर सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष शाम गुंजकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, सर्व विद्यार्थी तसेच ग्रामस्थांच्यावतीनेही अभिनंदन करण्यात आले.

## उकाडा, पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शाळा सकाळच्या सत्रात भरवाव्यात

● **अकोले । वीरभूमी** –

मान्सूनला विलंब, वाढलेला उकाडा आणि पाणीटंचाईची स्थिती लक्षात घेता विदर्भ वगळता राज्यातील शाळा किमान १५ दिवस सकाळच्या सत्रात भरवाव्यात, अशी मागणी क्टिव्ह टीचर्स फोरम महाराष्ट्रचे संयोजक भाऊसाहेब चासकर यांनी केली आहे. सोमवार (दि. १५) पासून विदर्भ वगळता राज्यातील शाळा सुरू होत आहेत. मात्र मराठवाडा, खानदेश, पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागांत उष्णतेची तीव्रता कायम आहे. अनेक शाळांमध्ये लोखंडी पत्र्यांची छपरे, वीजजोडणीचा अभाव आणि पाण्याची टंचाई असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यासंदर्भात चासकर यांनी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे व शिक्षण विभागाकडे निवेदन सादर केले आहे. हवामानातील बदल लक्षात घेऊन शैक्षणिक नियोजनात लवचिकता आणण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. प्रचंड ऊन, अतिवृष्टी किंवा शेतीच्या हंगामामुळे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर परिणाम होतो. त्यामुळे शैक्षणिक नियोजनाचे अधिकार स्थानिक पातळीवर देण्याची गरज असल्याचे मत ज्येष्ठ शिक्षण कार्यकर्त्या गीता महाशब्दे यांनी व्यक्त केले. तर अकोले शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रकाश साळवे म्हणाले, विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन शाळांच्या वेळांमध्ये बदल करण्याचे अधिकार शालेय व्यवस्थापन समितींना दिले पाहिजेत.

## अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण रद्द करा, मंत्री संजय शिरसाट यांच्याशी चर्चा

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –

अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या प्रमुख मागणीसाठी बीड ते मंत्रालय, मुंबई असा निघालेल्या लॉंग मार्चच्या पार्श्वभूमीवर समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने राज्याचे समाज कल्याण मंत्री संजय शिरसाठ यांची शासकीय विश्रामगृह येथे भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी लॉंग मार्च स्वागत समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक सुरेश बनसोडे, ज्येष्ठ आंबेडकरी नेते अशोक गायकवाड, सुमेध गायकवाड, निवृत्ती आरु, अमित काळे, प्रा. जयंत गायकवाड, एन एम पवळे, विशाल गायकवाड प्रा भिमराव पगारे , सिद्धार्थ राजगुरु यांच्यासह आंबेडकरी समाजातील कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना सुरेश बनसोडे यांनी सांगितले की, बीड ते मुंबई निघालेल्या लॉंग मार्चबाबत शासनाची भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी मंत्री संजय शिरसाट यांच्याकडे करण्यात आली. तसेच या आंदोलनाबाबत शासनाने मध्यस्थी करून आंदोलनकर्ते व शासन यांच्यात सकारात्मक संवाद घडवून आणावा, अशीही मागणी करण्यात आली. यावर मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले की, २०२६ ची जनगणना पूर्ण होईपर्यंत अनुसूचित जातीतील उपवर्गीकरणाच्या अंमलबजावणीला स्थगिती देण्यात आली असून, याबाबत शासनाची भूमिका स्पष्ट आहे. तसेच आंदोलनाच्या आयोजकांशी चर्चा करून पुढील दिशा ठरविण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. पुढे बोलताना सुरेश बनसोडे म्हणाले की, उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर राज्यभरातून एक लाखांहून अधिक हरकती प्राप्त झालेल्या आहेत. या सर्व हरकतींचा विचार करून संबंधितांचे म्हणणे शासनापर्यंत पोहोचविण्यात आले आहे. आंदोलनकर्ते आणि राज्य सरकार यांच्यात समेट घडवून आणण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली. दरम्यान, बीड ते मुंबई लॉंग मार्च १५ जून रोजी सायंकाळी ६ वाजता अहिल्यानगर शहरात दाखल होणार असून, चांदणी चौक येथे समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने भव्य स्वागत करण्यात येणार आहे.

---

## सिताबाई थिटे डी. फार्मसी येथे मोफत नेत्र तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

● **निघोज । वीरभूमी** –

श्री छत्रपती संभाजी शिक्षण संस्थेच्या सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी (डी.फार्म.) राष्ट्रीय सेवा योजना युनिट तसेच आनंद ऋषीजी नेत्रालय व्हिजन सेंटर शिरूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १० जून रोजी जागतिक नेत्रदान दिनानिमित्त महाविद्यालयामध्ये मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या शिबिरामध्ये नेत्र तपासणी, मोतीबिंदू तपासणी, चष्म्याचा नंबर तपासणी तसेच विविध नेत्रविकारांचे निदान करून योग्य तो वैद्यकीय सल्ला देण्यात आला. मोतीबिंदूचे निदान झालेल्या रुग्णांना आनंद ऋषीजी हॉस्पिटल अहिल्यानगर येथे अल्पदरामध्ये मोतीबिंदूचे ऑपरेशन करण्याचा सल्ला देण्यात आला.

यावेळी नेत्रतज्ञ श्री रोहित स्वामी व श्री संदीप पाडोळे यांनी नेत्रदानाचे महत्त्व त्याविषयीचे समज, गैरसमज व दृष्टीहीनांना नवजीवन देण्यासाठी नेत्रदानाची गरज याबाबत मार्गदर्शन केले.

या शिबिरामध्ये डी.फार्मसी, बी. फार्मसी, नर्सिंग महाविद्यालयाचे तसेच विजयामाला स्कूल व ज्युनियर कॉलेजचे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व नागरिक अशा एकूण १९७ जणांनी सहभाग नोंदविला.

संस्थेचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र थिटे साहेब यांनी ग्रामीण भागात आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी तसेच विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यासाठी संस्था नेहमीच प्रयत्नशील असल्याचे सांगत नेत्र तपासणीचे महत्त्व अधोरेखित केले तसेच सर्वांना मरणोत्तर नेत्रदान करण्याचे आवाहन देखील केले.

या शिबिराच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शहा, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयक प्रा. विशाल कारखिले, प्रा. निखिल केदारी, प्रा. निशा केसकर, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## वीरभूमीचे तालुका प्रतीनिधी अनिल खाटेर यांना ‘राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारीता’ पुरस्कार प्रदान

● **पाथर्डी । वीरभूमी** –

राहुरी येथील आधार फाउंडेशन व एस.आर. २४ न्यूज यांच्या संयुक्त विद्यमाने देणारा येणारा ‘राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारीता’ पुरस्कार वीरभूमीचे पाथर्डी तालुका प्रतिनिधी अनिल खाटेर यांना दिमाखदार सोहळ्यात प्रदान करण्यात आला.



आयोजित करण्यात आलेला राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा २०२६ महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे अत्यंत उत्साहपूर्ण व दिमाखदार वातावरणात संपन्न झाला. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, पत्रकार, महिला उद्योजिका, युवक आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना यावेळी सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन आणि स्वागत गीताने करण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरणाचा मुख्य सोहळा पार पडला.

पुरस्कारार्थींना शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब हंडाळ, आधार फाउंडेशनच्या अध्यक्षा राधिकाताई खेमनर, आयोजक पत्रकार रमेश खेमनर, शिवसेना नेते रावासाहेब खेवरे, नगरसेवक संतोष चोळके, विजय तमनर, रामदास बाचकर, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष सुभाष गुंदेचा यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

---

## प्रत्येक गावातील दारू व गुटखा विक्रीविरोधात दारूबंदी आंदोलनाचा निर्धार

### अकोले तालुका दारूबंदी आंदोलनाच्या अध्यक्षपदी हेरंब कुलकर्णी । प्रत्येक गावात कार्यकारिणी स्थापन करून मोहीम राबविणार

● **अकोले । वीरभूमी**–

पोलीस व उत्पादन शुल्क विभागाच्या कथित हप्तेखोरीमुळे अवैध दारूविक्री थांबत नसल्याने वर्षानुवर्षे तीच व्यक्ती त्याच गावांमध्ये दारूची विक्री करत असल्याचा आरोप दारूबंदी आंदोलनाच्या कार्यकर्त्यांनी केला. त्यामुळे ज्या गावांमध्ये दारू विकली जाते, त्या गावांतील तरुण व महिलांना आक्रमकपणे संघटित करून पोलीस व उत्पादन शुल्क विभागाला जाब विचारत दारू व गुटखा विक्री थांबविण्याचा निर्धार दारूबंदी आंदोलनाच्या बैठकीत व्यक्त करण्यात आला. तालुक्यातील अनेक गावांतील कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते.

बैठकीनंतर सर्व कार्यकर्त्यांनी अकोले पोलीस ठाण्यात जाऊन सर्वांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन सादर केले. ज्या गावांमध्ये अवैध दारू विक्री सुरू आहे, त्या गावांतील पोलीस पाटील व बीट अंमलदार यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

आंदोलन अधिक प्रभावी करण्यासाठी अकोले तालुका दारूबंदी आंदोलनाची कार्यकारिणी स्थापन करण्यात आली असून प्रत्येक गावात जाऊन स्थानिक कार्यकारिणी तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. अकोले तालुका दारूबंदी आंदोलनाच्या अध्यक्षपदी हेरंब कुलकर्णी यांची एकमताने निवड करण्यात आली.

कार्यकारिणी सदस्य म्हणून मच्छिंद्र देशमुख (कोतूळ), सुभाष गायकर (ब्राह्मणवाडा), प्रदीप हासे (म्हाळादेवी), हरिभाऊ फापाळे (लिंगदेव), संतोष मुतडक (राजूर), सुनील उगले (डोंगरगाव), रवी मालुंजकर (रुंभोडी), अविनाश कानवडे (मेहेंदुरी), जालिंदर बोडके (देवठाण), अमोल ठुबे (हिवरगाव), सुनील शेळके (चास), तुकाराम वाकचौरे (पिंपळगाव निपाणी), अभिमन्यू अस्वले (वीरगाव), राजेंद्र कुमकर (तांभोळ), अनिल कोळपकर (अकोले) आणि कैलास नवले (नवलेवाडी) यांची निवड करण्यात आली.



प्रत्येक गावात जाऊन गावकऱ्यांसह दारूविक्रीच्या ठिकाणांना भेटी देण्यात येणार असून त्याबाबतचा अहवाल जिल्हा पोलीस अधीक्षकांना सादर केला जाणार आहे. तसेच त्यांनी अकोल्यात येऊन राजूर येथील दारूबंदी गावाची स्थिती पाहावी आणि तेथे बैठक घ्यावी, असे निमंत्रण देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

बैठकीत उपस्थित कार्यकर्त्यांनी दारू व गुटखा विक्रीची भयावह स्थिती मांडली. पोलीस व उत्पादन शुल्क विभागाच्या कथित हप्तेखोरीमुळे अवैध दारूविक्री वाढत असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

यावेळी डोंगरगावचे सरपंच दशरथ उगले, म्हाळादेवीचे अनिल मुठे, तसेच भाऊसाहेब नाईकवाडी उपस्थित होते.

---

# पावसाच्या लपंडावाने पारनेरचा बळीराजा चिंतेत

## मृग नक्षत्र कोरडेच; पाऊस लांबल्याने खरीप हंगामाच्या पेरण्या रखडल्या

● **पारनेर । वीरभूमी** –

जून महिना अर्ध्यावर आला तरीही पावसाने अपेक्षित हजेरी न लावल्याने पारनेर तालुक्यातील बळीराजा मोठ्या चिंतेत सापडला आहे. मृग नक्षत्र कोरडे गेल्याने खरीप हंगामाच्या पेरण्या लांबणीवर पडल्या असून, शेतकरी आता आभाळाकडे डोळे लावून पावसाची प्रतीक्षा करत आहे.

तालुक्यातील शेतकऱ्यांनी पावसाच्या आगमनाची चाहूल लागताच मशागतीची कामे पूर्ण केली आहेत. बियाणे आणि खतांची खरेदी करून शेतकरी पेरणीसाठी सज्ज झाला होता. मात्र, पावसाने पाठ फिरवल्यामुळे शेतातील चिपाड जमिनी तशाच पडून आहेत. पेरणीयोग्य पाऊस नसल्याने अनेक ठिकाणी पेरणीची कामे थांबली आहेत.

पारनेर परिसरातील शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून आहे. वेळेवर पाऊस झाला नाही, तर खरीप हंगामाच्या उत्पादनावर त्याचा थेट परिणाम होतो. पावसाअभावी पेरणी उशिरा झाल्यास पिकांची वाढ खुंटण्याची आणि उत्पादनात घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ग्रामीण भागातील संपूर्ण अर्थकारण शेतीवर आधारित असल्याने पावसाच्या या लपंडावामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक नियोजनाचे गणित पूर्णपणे बिघडले आहे.

याबाबत बोलताना स्थानिक शेतकरी तुषार सोनवणे म्हणाले, आम्ही सर्व तयारी पूर्ण केली आहे. मात्र, पाऊस लांबल्यामुळे पेरणीचा खर्च वाढणार आहे. शिवाय दुबार पेरणीचे संकट ओढवेल की काय, अशी भीती वाटत आहे.

सध्या बळीराजा अस्मानी संकटापुढे हतबल झाला असून, वरुणराजाने लवकरात लवकर हजेरी लावावी, अशी प्रार्थना प्रत्येक शेतकरी करत आहे. सर्वांच्या नजरा आभाळाकडे लागल्या आहेत.

पावसाचे आगमन आणखी लांबल्यास तालुक्यात चारा टंचाई आणि पिण्याच्या पाण्याची समस्याही निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संपूर्ण पारनेर तालुक्याचे लक्ष आता वेधशाळेच्या अंदाजाकडे आणि आभाळातील ढगांकडे लागले आहे.



## SPOT NEWS

### सनईवादन सुनिल बर्वे राष्ट्रीय साई जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित!

**• पारनेर । वीरभूमी –**



पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठा येथील ज्येष्ठ सनईवादन कलावंत सुनिल विष्णू बर्वे यांना त्यांच्या प्रदीर्घ कलासेवेबद्दल मानाचा 'राष्ट्रीय साई जीवन गौरव पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. शिर्डी येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य लोककलावंत मेळाव्यात मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. साई देवस्थान आणि महाराष्ट्र राज्य लोककलावंत सांस्कृतिक विचारमंच यांच्या संयुक्त विद्यमाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुनिल बर्वे हे गेल्या ४० वर्षांपासून सनई, ढोलकी, हार्मोनियम, पखवाज आणि गायन यांसारख्या विविध कलाप्रकारांतून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत मोलाचे योगदान देत आहेत. त्यांच्या या निरलस सेवेची दखल घेऊन त्यांना या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कार वितरण सोहळ्यास लोककलावंत संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गवनेर सरोदे, निर्मला सरोदे, शिर्डी देवस्थानचे मुख्य व्यवस्थापक कोकणे साहेब, राक्षे साहेब, लोककलावंत संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष बाळसाहेब शिरतार, राज्य प्रसिद्धी प्रमुख संजय मोरे, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष राजू मुनतोडे, सर्जेराव कदम आणि पारनेर तालुका महिला अध्यक्ष मनिषाताई चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या सन्मानामुळे पिंपळगाव रोठासह संपूर्ण पारनेर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, लोककलावंतांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### अंजनापूर ग्रामस्थांचे प्रश्न प्राधान्याने सोडवणार : जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया

**• शिर्डी । वीरभूमी –**

कोपरगाव तालुक्यातील अंजनापूर येथे आयोजित 'ग्रामसंवाद' कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. ग्रामस्थांनी मांडलेल्या विविध समस्यांवर सर्व शासकीय विभागांशी समन्वय साधून जास्तीत जास्त प्रश्न मार्गी लावले जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी आमदार आशुतोष काळे उपस्थित होते. उपलब्ध विकासनिधी व तांत्रिक बाबींचा विचार करून गावातील प्रलंबित कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात येतील, असे जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी डॉ. बाबासाहेब कोळेकर, उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, तहसीलदार महेश सावंत, सरपंच कविता गव्हाणे व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या बैठकीत रस्ते, वीज व पाणी या मूलभूत सुविधांवर प्रामुख्याने चर्चा झाली. जिल्हाधिकारी म्हणाले, गावांतर्गत रस्ते तसेच कोपरगाव-संगमनेर रस्त्याची दुरवस्था दूर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यवाही केली जाईल. महावितरणच्या रोहित्रांबाबत वारंवार उद्भवणाऱ्या समस्या तसेच पाणीवाटपाशी संबंधित प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी महसूल प्रशासन सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले. गेल्या काही वर्षांच्या आकडेवारीनुसार गावात एक हजार मुलांमागे मुलींचे प्रमाण केवळ सातशे ते आठशे इतके असल्याची बाब अत्यंत चिंताजनक असून, ग्रामपंचायत व प्रशासनाने यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. स्वच्छ भारत अभियानांतर्गत कचरा विलगीकरण अधिक प्रभावीपणे राबविण्यात यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. गावात राष्ट्रीयीकृत बँकेची शाखा तसेच दर्जेदार मोबाईल नेटवर्क उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत असल्याचे चर्चेतून समोर आले. या समस्येच्या निराकरणासाठी दूरसंचार विभागाकडे अधिकृत प्रस्ताव पाठवून मोबाईल नेटवर्क सुधारण्यासाठी प्रयत्न केले जातील. तसेच नागरिकांच्या सोयीसाठी विशेष शिबिरे आयोजित करून आधार कार्ड अद्ययावतीकरण, शिधापत्रिका व आयुष्मान भारत योजनेशी संबंधित प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. गावाने वृक्षारोपण व सामाजिक कामांत घेतलेल्या पुढाकाराचे तसेच स्थानिक तरुणांच्या कार्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष कौतुक केले. आमदार श्री.काळे म्हणाले, अंजनापूर व परिसरातील गावांचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी निळवंडे प्रकल्प, गोदावरी कालवा व उजनी उपसा जलसिंचन योजनेचा मोठा फायदा होत आहे. भाविकांमुळे सावळीविहीर ते कोल्हार मार्गावर होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी झगडे फाटा ते तळेगाव दिघे राज्य मार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्याची गरज आहे. राज्य शासनाकडून वीस कोटी रुपयांचा निधी मंजूर झालेल्या या रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर संबंधित यंत्रणांनी प्राधान्याने मार्गी लावावे. तसेच गावातील रस्ते, वीज जोडणी व महावितरणच्या प्रलंबित समस्या प्रशासनाने तातडीने सोडवाव्यात, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

# पारनेर बसस्थानकावर मोकाट कुत्र्यांचा हैदोस

**ज्येष्ठ महिला पडून जखमी । तातडीने उपाययोजना करण्याची प्रवाशांची मागणी**

**• पारनेर । वीरभूमी –**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे पारनेर बसस्थानक हे तालुक्यातील प्रवासाचे प्रमुख केंद्र असून, दररोज हजारो प्रवाशांची येथे वर्दळ असते. मात्र, सध्या बसस्थानक परिसरात मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव पाहता प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

पारनेर बसस्थानक हे ग्रामीण व शहरी भागाला जोडणारा महत्त्वाचा दुवा मानले जाते. गेल्या काही दिवसांपासून बसस्थानक परिसरात सात ते आठ मोकाट कुत्र्यांचे टोळके सतत वावरत असून, बसस्थानकाचे प्रवेशद्वार, फलाट आणि बस आगमनाची ठिकाणे हे त्यांचे मुख्य अड्डे बनले आहेत. फलाटांवर मुक्तपणे वावरणाऱ्या या कुत्र्यांमुळे प्रवाशांची, विशेषतः महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.



अनेकदा बसस्थानकात येणाऱ्या प्रवाशांच्या अंगावर ही कुत्री अचानक धावून जात असल्याने घबराट निर्माण होत असून, पळापळीत अपघात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

बसस्थानकावरील कुत्र्यांच्या त्रासाचे गांभीर्य नुकत्याच घडलेल्या एका घटनेतून समोर आले. स्मार्ट कार्ड काढण्यासाठी रांगेत उभ्या असलेल्या ज्येष्ठ महिलांच्या गर्दीत अचानक कुत्री घुसल्याने एकच धावपळ उडाली. या गोंधळात एक वृद्ध महिला फरशीवर पडून जखमी झाली. या घटनेमुळे प्रवासी वर्गातून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

बसस्थानक परिसरातील अस्वच्छता आणि पडून राहणारे अन्नाचे अवशेष यामुळे मोकाट कुत्र्यांचा वावर वाढल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. सार्वजनिक ठिकाणी प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी परिवहन प्रशासन आणि स्थानिक नगरपंचायतीची असली, तरी अद्याप या समस्येवर कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याची खंत प्रवाशांनी व्यक्त केली.

प्रशासनाने मोकाट कुत्र्यांचे लसीकरण करून त्यांना तातडीने सुरक्षित स्थळी स्थलांतरित करावे, अन्यथा भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडल्यास त्यास प्रशासनच जबाबदार राहील, असा इशारा प्रवाशांनी दिला आहे.

बसस्थानकावरील सुरक्षिततेचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी नागरिक आता आक्रमक झाले असून, मोकाट कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी त्वरित कारवाई करण्याची मागणी होत आहे.

याबाबत पारनेर आगार प्रमुखांशी चर्चा करून बसस्थानकावरील मोकाट कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी निवेदन देण्यात येणार असल्याचे आरपीआयचे तालुका अध्यक्ष किरण सोनवणे यांनी सांगितले.

## ऑपरेशन मुस्कान अंतर्गत श्रीगोंदा पोलिसांची तत्पर कारवाई

**अल्पवयीन मुलीचा मुंबईत शोध घेऊन पालकांच्या ताब्यात दिले**

**• श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा तालुक्यातील एका अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याबाबत तिच्या पालकांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात दि. ११ जून २०२६ रोजी तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी श्रीगोंदा पोलिसांनी तात्काळ तपास सुरू करून 'ऑपरेशन मुस्कान' अभियानांतर्गत संबंधित अल्पवयीन मुलीचा मुंबई येथे शोध घेऊन तिला सुरक्षितपणे तिच्या पालकांच्या ताब्यात दिले.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. १० जून २०२६ रोजी रात्री १०:०० वाजल्यापासून ते दि. ११ जून २०२६ रोजी पहाटे २:०० वाजेच्या सुमारास संबंधित मुलगी राहत्या घरातून कोणालाही काहीही न सांगता निघून गेली होती. त्यानंतर ती परत न आल्याने तिच्या अपहरणाची शक्यता व्यक्त करण्यात आली. याबाबत श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ५८८/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक संजय वाघमारे, पोलीस हेड कॉन्स्टेबल नितिन गाडगे व पोलीस कॉन्स्टेबल राजेश जाधव यांनी केला. तपासादरम्यान तांत्रिक माहितीच्या आधारे मुलीचा मुंबई येथे शोध घेण्यात आला. त्यानंतर तिला ताब्यात घेऊन सुरक्षितपणे तिच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. मुलीच्या अपहरणाबाबत पुढील सखोल तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने तसेच पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

तपास कार्यात अहिल्यानगर दक्षिण मोबाईल सेल येथील पोलिस हवालदार श्री. गुंडू व श्री. सांगळे यांनी तांत्रिक मदत केली.

## पोनि. आनंद कोकरे यांचा वंचित बहुजन आघाडीकडून सत्कार

**• पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी पोलीस ठाण्यात काल नव्याने रुजू झालेले पोलिस निरीक्षक आनंद कोकरे यांचा पाथर्डी तालुका वंचित बहुजन आघाडी व संविधान प्रेमी नागरिकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.



तालुक्यातील गोरगरीब, वंचित आणि सर्वसामान्य नागरिकांना पोलीस ठाण्यात न्याय मिळावा, त्यांच्या तक्रारींना प्राधान्य देण्यात यावे तसेच पोलिस प्रशासनाने जनतेचा विश्वास संपादन करून कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करावी, अशी अपेक्षा वंचितचे तालुकाध्यक्ष पप्पूशेठ बोर्डे यांनी व्यक्त केली. तर दिंगबर गाडे यांनी पोलीस निरीक्षक कोकरे यांना शुभेच्छा व्यक्त करत आपली कारकीर्द पाथर्डी पोलीस स्टेशनच्या इतिहासात अविस्मरणीय ठरावी व या ठिकाणी लोकाभिमुख कारभार होत सर्व सामान्य गोरगरीब जनतेला न्याय व आधार मिळावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

या सत्कार समारंभास महेंद्र राजगुरू, शैलेंद्र बोंदर्डे, नितीन पवार, आकाश शिंदे, श्रीधर दौंडे, मीनाताई शिंदे, दत्तू सातपुते, सोपान भिंगारे, दिगंबर गाडे, सरसे सर, भीमराज शिंदे, अनिल बोर्डे, प्रकाश ठोंबे, सुनील जाधव, योगेश दौंडे, आबिद शेख, अमोल जाधव, विकास वाघमारे, सूरज क्षेत्रे, बाळासाहेब पांडागळे, अतुल कटारनवरे, लहू शिंदे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमातून पोलिस प्रशासन आणि सर्वसामान्य नागरिक यांच्यातील समन्वय अधिक दृढ होण्यास मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## सद्यस्थितीत घरपट्टी वाढवणे उचित नाही, जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे : आ. आशुतोष काळे

**• कोपरगाव । वीरभूमी–**



नगरपरिषद प्रशासनाने नागरिकांना वाढीव दराने घरपट्टी दिल्या आहेत. परंतु सद्याची परिस्थिती पाहता घरपट्टी वाढवणे उचित नाही. त्याबाबत आपण व्यक्तिश: लक्ष घालावे अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्याकडे केली.

जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी शुक्रवार (दि.१२) रोजी कोपरगाव तालुक्यातील अंजनापूर गावात भेट दिली यावेळी आमदार आशुतोष काळे यांनी मतदार संघातील विकासाच्या विविध प्रलंबित प्रश्नाबरोबरच कोपरगावकरांच्या वाढीव घरपट्टीकडे जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. ते म्हणाले की, कोपरगाव नगरपरिषद प्रशासनाकडून कोपरगाव शहरातील नागरीकांची घरपट्टी वाढविणे प्रस्तावित होते. त्याबाबत असंख्य नागरीकांनी हरकती नोंदविल्या असून त्या हरकतींची अद्याप सुनावणी झालेली नसतांना अचानकपणे कोपरगाव नगरपरिषद प्रशासनाकडून वाढीव दराने घरपट्ट्या देवून कर वसुली सुरु करण्यात आली आहे. सध्याची परिस्थिती पाहता महागाईचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून नागरीकांना संसार प्रपंच करतांना प्रचंड ओढाताण करावी लागत आहे. अशा परिस्थितीत कोपरगाव नगरपरिषदेने वाढव दराने घरपट्टी वसुली सुरु केल्यामुळे नागरीकांच्या अडचणी वाढणार आहेत. त्यामुळे एकूण परिस्थितीचा विचार करून वाढविण्यात आलेली घरपट्टी वाढ तूर्तास थांबवावी व त्याबाबत कोपरगाव नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास जगताप यांना सूचना द्याव्यात अशी मागणी केली. या मागणीला जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

दरम्यान वाढीव घरपट्टीच्या निर्णयासंदर्भात नगरपालिकेने विशेष सर्वसाधारण सभा बोलावण्याची मागणी राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी नगरपालिका उपमुख्याधिकारी मनोजकुमार पापडीवाल यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे. कोपरगाव नगरपरिषदेकडून अत्यंत चुकीच्या पद्धतीने घरपट्टी वाढ करण्यात आली असून याचा ज्येष्ठ नागरिक, मध्यमवर्गीय कुटुंब, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांवर वाढीव कराचा आर्थिक भार पडणार आहे. वाढीव घरपट्टी आणि मालमत्ता करासंदर्भात तातडीची विशेष सर्वसाधारण सभा घेण्यात यावी. तसेच वाढीव घरपट्टीच्या निर्णयाचा पुनर्विचार करून कर आकारणीतील विसंगती व त्रुटींची सखोल निराकरण करावे. नागरिकांच्या हरकती व सूचनांचा विचार करावा आणि जुन्या कर आकारणी पद्धतीने घरपट्टी आकारणी करण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा असे निवेदनात म्हटले आहे.

# एआयमुळे नोकऱ्या जातात हा गैरसमज; सतत स्वत:ला अपडेट ठेवा

**एआय इंजिनिअर यश हौशीराम रंधे । आनंदगड शैक्षणिक संकुलात अमेरिकन शिक्षण पद्धती, एआय तंत्रज्ञान आणि नव्या करिअर संधींवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन**

**• अकोले । वीरभूमी–**

एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) हे प्रगत तंत्रज्ञान असून, एआयमुळे युवकांच्या नोकऱ्या गेल्या किंवा भविष्यात जातील हा गैरसमज असल्याचे प्रतिपादन अकोल्याचे भूमिपुत्र तथा अमेरिका स्थित एआय इंजिनिअर यश हौशीराम रंधे यांनी केले. एआय तंत्रज्ञानामध्ये सातत्याने बदल होत असतात. या बदलांनुसार स्वतःला अद्ययावत न ठेवणाऱ्या अभियंता युवकांच्या नोकऱ्यांवर परिणाम होत असल्याने युवकांनी सातत्याने अपडेट राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

आनंदगड शैक्षणिक संकुल, वीरगाव येथे पॉलिटेक्निक कॉलेज, फार्मसी कॉलेज व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी अमेरिकन शिक्षण पद्धती व एआय तंत्रज्ञानातील नव्या संधी या विषयावर आयोजित मार्गदर्शनपर व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे होते.

यावेळी संस्थेचे सचिव डॉ. अनिल रहाणे, फार्मसी कॉलेजच्या प्राचार्या डॉ. पल्लवी फलके, समन्वयक विद्याचंद्र सातपुते, धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मीडियम स्कूलचे उपप्राचार्य संदीप थोरात, आनंदगड पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा. विनोद गिरी, सर्व प्राध्यापक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतीय आणि अमेरिकन शिक्षण पद्धतीतील फरक स्पष्ट करताना यश रंधे म्हणाले की, भारतामध्ये विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम, कालावधी आणि परीक्षा पूर्वनियोजित असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वतःच्या आवडीनुसार निर्णय घेण्याची मर्यादित संधी मिळते. मात्र अमेरिकेमध्ये विद्यार्थ्यांना स्वतःचा अभ्यासक्रम व विषय निवडण्याचे स्वातंत्र्य असते. वर्ग आठवड्यातून दोन किंवा तीन दिवस असतात आणि थिअरीपेक्षा प्रॅक्टिकलवर अधिक भर दिला जातो.

अमेरिकन शिक्षण पद्धतीमध्ये सेल्फ स्टडी, प्रोजेक्ट्स, सादरीकरणे आणि स्वतः ला प्रभावीपणे मांडण्यावर भर दिला जातो. तेथे कॅम्पस इंटरव्ह्यूची पद्धत नसून, सर्वांशी सातत्याने संपर्क ठेवणे महत्त्वाचे असते. अनेकदा ओळखीतून आणि संवादातूनही नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. मात्र त्यासाठी स्वतः प्रयत्न करावे लागतात.

अमेरिकेत प्राध्यापक अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती तसेच परीक्षा घेण्याबाबत निर्णय घेतात. विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट्स दिले जातात आणि त्यांचे प्रेझेंटेशन करावे लागते. बाजारपेठेतील बदल लक्षात घेऊन अभ्यासक्रम सातत्याने अद्ययावत केला जातो. सेमिस्टर पद्धतीमध्ये प्रोजेक्ट्स, क्लासेस आणि होमवर्क पूर्ण करावे लागतात. दोन वर्षांचा अभ्यासक्रम दीड वर्षात पूर्ण करण्याचीही संधी उपलब्ध असते. विद्यार्थ्यांनी एकमेकांशी सातत्याने संवाद ठेवणे, स्वतःची ओळख निर्माण करणे, तसेच स्किल आणि टीमवर्क विकसित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

परदेशात शिक्षणासाठी जाण्यासाठी पूर्वतयारी आवश्यक असते. रिसर्च पेपर्स सादर करावे लागतात. आवश्यक परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखतीत योग्य उत्तरे दिल्यास निवड होते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

एआय तंत्रज्ञानाबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, १९५० पासून एआय कार्यरत असून त्यात सातत्याने बदल होत गेले आहेत. सध्या त्याचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. एआयला आवश्यक असलेला डेटा, जसे की इमेज, व्हिडिओ आणि इतर माहिती दिल्यानंतर ते त्यावर प्रक्रिया करून आवश्यक माहिती उपलब्ध करून देते.



आज अनेकजण चॅटजीपीटीचा वापर करतात; मात्र ते नेमके कसे कार्य करते, हे समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. हेल्थकेअर, फायनान्स, शिक्षण, कृषी, सायबर सिक्युरिटी आणि मीडिया क्षेत्रांमध्ये एआयच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. भविष्यात क्लाउड प्लॅटफॉर्मचा वापरही मोठ्या प्रमाणावर वाढणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

एआयच्या माध्यमातून काही मिनिटांत आवश्यक माहिती, आराखडे आणि विविध प्रकारचे साहित्य तयार करता येते. एखादा व्यवसाय सुरू करायचा असल्यास त्यासाठी दिशा, माहिती आणि वेळोवेळी मार्गदर्शनही मिळू शकते. त्यासाठी केवळ नावीन्यपूर्ण कल्पना असणे गरजेचे आहे. सध्या १५० हून अधिक एआय टूल्स उपलब्ध असून, त्यांचा योग्य वापर करून स्वतःची कंपनीही उभी करता येऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

यावेळी संस्थेचे सचिव डॉ. अनिल रहाणे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, पिंपळदरीसारख्या ग्रामीण भागातून स्वतः चे ध्येय निश्चित करून यश हौशीराम रंधे यांनी यशस्वी वाटचाल केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाचा केवळ दहा टक्के विद्यार्थ्यांनी जरी योग्य लाभ घेतला आणि स्वतःचे करिअर घडविले, तरी ती संस्थेसाठी मोठी जमेची बाजू ठरेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. घोलप यांनी केले. स्वागत प्राचार्य प्रा. विनोद गिरी यांनी, तर प्रास्ताविक समन्वयक विद्याचंद्र सातपुते यांनी केले. आभार प्रा. उमेश पटेकर यांनी मानले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# थेरगाव येथील नागेश्वर मंदिरातील दुसरा शिलालेख उजेडात

## मराठाकालीन ग्रामीण प्रशासन व वतनव्यवस्थेचा महत्त्वपूर्ण पुरावा । संशोधकांचा ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त सन्मान

■ **विजय उंडे**

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मौजे थेरगाव येथे नाग नदीच्या काठी वसलेल्या प्राचीन श्री नागेश्वर महादेव मंदिरामध्ये आणखी एक महत्त्वपूर्ण शिलालेख उजेडात आला आहे. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या उजव्या भिंतीवर कोरलेला हा शिलालेख देवनागरी लिपीत असून मराठी भाषेत लिहिलेला आहे. एकूण नऊ ओळींचा हा लेख कोरीव स्वरूपाचा असून प्रत्येक ओळीच्या सुरुवातीस दुहेरी उभे दंड देण्यात आले आहेत.

शिलालेखावर अनेक वर्षांपासून वातावरणाचा परिणाम, रंगरंगोटी तसेच चुन्याचे थर यामुळे अक्षरे मोठ्या प्रमाणात अस्पष्ट झाली होती. काही अक्षरे पूर्णतः विद्रूप झाल्याने वाचन करणे अत्यंत कठीण झाले होते. मात्र संशोधकांनी घेतलेल्या छापाच्या आधारे अथक प्रयत्नांनंतर शिलालेखाचे वाचन शक्य झाले.

*१. ॥ श्री नागनाथ प्रसन्न*
*२. ॥ माणको आनंत व पद्मोजी आनं*
*३. ॥ त व व्यंकटराव आनंत यकबोटे*
*४. ॥ कुलकर्णी व जोशी मौजे थे खांडवी मांदलीची*
*५. ॥ थिटे सांगवी रवळगाव कोकमठाण*
*६. ॥ सांगवी बा ॥ (बुद्रुक) उपगाव प्रा. ॥ पांडे*
*७. ॥ पेडगाव सके १६६६ रक्ताक्षि*
*८. ॥ नाम संवछरे*

शिलालेखाचे संशोधन राजेश पोपट इंगळे यांनी केले असून वाचन इतिहास संशोधक अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे.

या शिलालेखात श्री नागनाथ प्रसन्न या मंगलाचरणाने प्रारंभ करण्यात आला असून तत्कालीन धार्मिक श्रद्धा व नागनाथ देवतेचे स्थान अधोरेखित होते. शालिवाहन शक १६६६, रक्ताक्षि नाम संवत्सर अर्थात इ.स. १७४४–४५ असा स्पष्ट कालोल्लेख यात आढळतो.

लेखात माणको अनंत, पद्मोजी अनंत आणि व्यंकटराव अनंत यकबोटे या व्यक्तींचा उल्लेख असून ते खांडवी, मांदळी, थिटे सांगवी, रवळगाव, कोकमठाण व सांगवी बुद्रुक या गावांचे कुलकर्णी आणि जोशी होते. यावरून त्या काळातील महसुली, लेखनिक तसेच धार्मिक व्यवहारांची जबाबदारी विशिष्ट वतनदार घराण्यांकडे असल्याचे स्पष्ट होते.

शिलालेखात पांडे–पेडगाव प्रांतातील विविध गावांचा उल्लेख आढळत असल्याने यकबोटे घराण्याचे अधिकारक्षेत्र अनेक गावांवर पसरलेले असावे, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे मराठाकालीन ग्रामीण प्रशासन, वतनव्यवस्था आणि गावसमूहांची रचना समजून घेण्यासाठी हा लेख अत्यंत महत्त्वाचा पुरावा ठरतो.



हा शिलालेख केवळ व्यक्तींची नोंद नसून मराठाकालीन सामाजिक, धार्मिक आणि प्रशासकीय व्यवस्थेचा जिवंत दस्तऐवज आहे. नागनाथ देवतेचे स्मरण, कुलकर्णी–जोशी पदांचा उल्लेख आणि विविध गावांची नोंद यामुळे तत्कालीन गावपातळीवरील प्रशासनाची रचना स्पष्ट होते. विशेषतः वतनदारी व्यवस्थेतील घराण्यांचे महत्त्व, धार्मिक संस्थांचे स्थान आणि ग्रामव्यवस्थेतील परस्परसंबंध यांचा अभ्यास करण्यासाठी हा शिलालेख संशोधकांसाठी मौल्यवान ठरणार आहे.

या संशोधन मोहिमेत शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन संचालित शिवदुर्ग वारसा संवर्धन समितीचे राजेश इंगळे, दिगंबर भुजबळ, प्रा. कानिफ उगले, सरपंच अनिल शिंदे, माजी सरपंच मिनीनाथ शिंदे, रवींद्र महानवर, गोरख शिंदे, युवक नेते किरण शिंदे, आबुनाना नन्नवरे तसेच ग्रामविकास अधिकारी महेश जगताप यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



आपल्या गावाचा इतिहास उजेडात आणणाऱ्यांचा सन्मान व्हायलाच हवा, अशी भावना व्यक्त करत थेरगाव ग्रामस्थांनी संशोधकांचा उत्स्फूर्त सत्कार केला. शिलालेखाचा छाप घेण्यासाठी संशोधक गावात आले असल्याचे समजताच ग्रामस्थांनी मंदिर परिसरात मोठी गर्दी केली. आपल्या पूर्वजांचा आणि गावाच्या वैभवशाली इतिहासाचा मागोवा आता नव्याने समोर येणार असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये दिसून आली. यानंतर ग्रामपंचायत कार्यालयात इतिहास संशोधक अनिल दुधाणे, शिवदुर्गचे अध्यक्ष राजेश इंगळे व दिगंबर भुजबळ यांचा सरपंच, उपसरपंच आणि ग्रामसेवक यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. गावातील तरुणांनी दाखवलेली इतिहासाबद्दलची जाणीव आणि वारशाबद्दलचा अभिमान हा परिसरात कौतुकाचा विषय ठरत आहे.

# ह.भ.प. नितीन महाराज शिंदे यांच्यावर जीवघेणा हल्ला

## पहाटे माऊलीकृपा गोशाळेजवळ अज्ञात हल्लेखोरांचा सापळा । विविध अंगांनी पोलिसांचा तपास सुरू

● **पारनेर । वीरभूमी–**

तालुक्यातील शहाजापूर येथील माऊलीकृपा गोशाळेचे संचालक तथा ह.भ.प. नितीन महाराज शिंदे यांच्यावर शनिवारी पहाटे अज्ञात हल्लेखोरांनी केलेल्या जीवघेण्या हल्ल्यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या हल्ल्यात शिंदे महाराज गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पहाटे तीन ते पाच वाजण्याच्या दरम्यान ही घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे.

गेल्या बारा वर्षांपासून शहाजापूर येथील माऊलीकृपा गोशाळा तसेच श्री क्षेत्र कौडेश्वर मंदिर परिसरात गोरक्षण आणि गोसेवेचे कार्य करणारे नितीन महाराज शिंदे हे परिसरात परिचित व्यक्तिमत्त्व आहेत. उपचारादरम्यान माध्यमांशी बोलताना त्यांनी हल्ला पूर्वनियोजित असल्याचा आरोप केला. आपल्याला जिवे मारण्याचा अथवा कायमस्वरूपी अपंग करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

शिंदे महाराज यांच्या म्हणण्यानुसार, पहाटे गोशाळेच्या मागील बाजूस कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज आल्याने ते पाहणीसाठी गेले असता चार ते पाच अज्ञात हल्लेखोर दबा धरून बसलेले होते. त्यांनी चेहरे कापडाने झाकले होते. आपण तेथे पोहोचताच हल्लेखोरांनी तोंड दाबून मारहाण करण्यास सुरुवात केली. धारदार शस्त्रे आणि लोखंडी रॉडच्या साहाय्याने हल्ला करण्यात आला. चेहऱ्यावर चाकूने वार करण्याचा प्रयत्न झाल्याने प्रतिकार करताना हातावर जखम झाल्याचेही त्यांनी सांगितले.

हल्लेखोरांनी डोंगराच्या उताराकडे फरफटत नेत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच दगडांवर आपटून गंभीर दुखापत करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही शिंदे महाराज यांनी केला. या मारहाणीत कंबर आणि शरीराच्या विविध भागांना गंभीर दुखापत झाली असून सध्या पायात मुंग्या येत असल्याचे त्यांनी सांगितले.

हल्लेखोरांच्या तावडीतून कसाबसा सुटून आपण डोंगरातील दरीत लपल्याचे शिंदे महाराज यांनी सांगितले. गंभीर मार लागल्याने तेथेच काही काळ बेशुद्ध अवस्थेत पडून राहिल्याचा दावा त्यांनी केला. झटापटीदरम्यान मोबाईल हरवल्याने कोणाशी संपर्क साधता आला नाही. सकाळी गोशाळेचे कर्मचारी आल्यानंतर त्यांनी शोध घेऊन त्यांना वर आणले आणि उपचारासाठी दाखल केले.

आपण हिंदुत्ववादी आणि वारकरी संप्रदायाचे कार्य करत असल्यामुळे काही समाजविघातक घटकांकडून पूर्वीही त्रास दिला गेला असल्याचा दावाही शिंदे महाराज यांनी केला. यापूर्वीही गोशाळेशी संबंधित काही घटना घडल्या असून त्याबाबत पोलिस प्रशासनाकडे तक्रारी केल्याचे त्यांनी सांगितले. राज्य सरकार आणि पोलिस प्रशासनावर विश्वास असून या प्रकरणात न्याय मिळेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, ही घटना नगर तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली असून नगर तालुका पोलिसांसह सुपा पोलिस ठाण्याच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. विभागीय पोलिस अधिकारी शिरीष वमने यांनीही घटनास्थळी भेट देत तपासाबाबत आवश्यक सूचना दिल्या आहेत. हल्ल्यामागील नेमके कारण, हल्लेखोरांची ओळख आणि त्यांचे उद्दिष्ट याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विविध अंगांनी तपास सुरू केला आहे.

विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी शहाजापूर डोंगरालगत असलेल्या हजरत शहारबशहा दर्ग्याची अज्ञातांकडून तोडफोड करण्यात आली होती. हिंदू–मुस्लिम ऐक्याचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या या स्थळावरील घटनेनंतर शिंदे महाराजांवर झालेला हल्ला पोलिसांसाठीही चिंतेचा विषय ठरला आहे. या दोन्ही घटनांमध्ये काही संबंध आहे का, याचाही तपास सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

# कोल्हेंकडून पश्चिम भागातील शेतकऱ्यांना नेहमीच सापत्नपणाची वागणूक; काळे गटाच्या उपसभापती व सदस्यांच्या राजीनाम्याचा निर्णय योग्यच : ज्ञानदेव मांजरे

● **कोपरगाव । वीरभूमी–**

मोर्वीस उपबाजार समितीच्या माध्यमातून कोपरगाव तालुक्याच्या पश्चिम भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालासाठी स्थानिक पातळीवर बाजारपेठ उपलब्ध होईल, वाहतूक खर्च वाचेल आणि पश्चिम भागातील शेतकऱ्यांची गैरसोय दूर होईल हि अपेक्षा फोल ठरली आहे. पश्चिम भागातील शेतकऱ्यांना आजवर कोल्हेंकडून नेहमीच सापत्नपणाची वागणूक मिळाली असून त्याची प्रचीती पुन्हा एकदा मोर्वीस उपबाजार समिती सुरु करण्याच्या उदासीनतेतून दिसून आली आहे. कोल्हेंच्या सांगण्यावरून सभापती साहेबराव रोहोम यांनी या उपबाजार समितीमध्ये सव्वा वर्षात फक्त वजनकाटा बसवला. हि एक प्रकारची पश्चिम भागातील शेतकऱ्यांची पिळवणूक असून अजूनही कोल्हेंकडून पश्चिम भागातील शेतकऱ्यांना सापत्नपणाची वागणूक दिली जात असल्याचे यावरून सिद्ध होत आहे. त्यामुळे काळे गटाच्या उपसभापती व सदस्यांनी राजीनामा देण्याचा घेतलेला निर्णय अतिशय योग्य असल्याचे कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हा.चेअरमन ज्ञानदेव मांजरे यांनी म्हटले आहे.



इतर उपबाजार समित्यांप्रमाणे कोपरगाव तालुक्याच्या पश्चिम भागात उपबाजार समिती होवून शेतकऱ्यांची होत असलेली गैरसोय दूर व्हावी हि आमदार आशुतोष काळे यांची प्रामाणिक इच्छा होती. तालुक्याच्या पश्चिम भागातील मोर्वीस (धामोरी) येथील हि उपबाजार समिती लवकरात लवकर सुरु व्हावी यासाठी काळे गटाच्या उपसभापती व सर्व सदस्यांचा आग्रह होता परंतु या उपबाजार समितीचे भूमिपूजन होऊन जवळपास सव्वा वर्षाचा कालावधी पूर्ण होवूनही या ठिकाणी बाजार समितीने शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदी सुरु केलेली नाही. त्यामुळे मागील तीन वर्षापासून सभापती साहेबराव रोहोम यांच्या मनमानी आणि हुकुमशाही कारभारामुळे बाजार समितीच्या कारभाराबाबत शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजीचे वातावरण आहे. तरी देखील कोल्हे सभापती साहेबराव रोहोम यांना पाठीशी घालत आहे यातून पश्चिम भागातील शेतकऱ्यांना त्रास व्हावा हि कोल्हेंची ईच्छा सभापती साहेबराव रोहोम पूर्ण करीत असल्याचे अधोरेखित होत आहे.

सव्वा वर्षात या उपबाजार समितीमध्ये शेतमाल खरेदी झाली नसल्यामुळे कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीला एक रुपयाचे उत्पन्न मिळालेले नाही. या उपबाजार समितीसाठी कराराने घेण्यात आलेल्या सहा एकर जागेसाठी जागा मालकाला प्रती वर्ष प्रति एकर ५० हजार याप्रमाणे एका वर्षाला बाजार समितीला रुपये ०३ लाख रुपये भाडे मोजावे लागत आहे. सव्वा वर्षाचे एकूण भाडे रक्कम पावणे चार लाख रुपये होत असले तरी बाजार समितीला मात्र चार आण्याचे पण उत्पन्न मिळालेले नाही. सभापती साहेबराव रोहोम नेत्याच्या मर्जीप्रमाणे वागत असून त्यामुळे शेतकऱ्यांची कामधेनु असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीची अधोगती होत आहे. हे पाप आपल्या माथी लागू नये यामुळे काळे गटाच्या उपसभापती व सदस्यांनी राजीनामा देण्याच्या भूमिकेचे पश्चिम भागातील शेतकऱ्यांच्या वतीने ज्ञानदेव मांजरे यांनी समर्थन केले आहे.

कोपरगाव तालुक्याच्या पश्चिम भागातील शेतकऱ्यांबाबत कोल्हेंनी नेहमीच दुजाभावाची भूमिका घेतली आहे. पश्चिम भागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्याचे पाप त्यांनी वारंवार केले आहे. ज्यावेळी मंजूर बंधारा पहिल्यांदा वाहून गेला त्याचवेळी देखभाल दुरुस्तीची जबाबदारी असणाऱ्या कोल्हेंनी जाणून बुजून दुर्लक्ष केल्यामुळे हा बंधारा तब्बल तीन वेळा वाहून गेला फक्त वाहून नाही गेला तर शेतकऱ्यांच्या जमिनी, विहिरी, उभी पिके पुराच्या पाण्यात वाहून जावून असंख्य शेतकऱ्यांचे संसार उध्वस्त झाले. हे कोल्हेंच्या बेपर्वाईचे परिणाम होते. आज आमदार आशुतोष काळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. सव्वा वर्ष उलटूनही मोर्वीस उपबाजार समिती सुरू न होणे हे देखील कोल्हेंच्या पश्चिम भागातील शेतकऱ्यांप्रती असलेल्या दुजाभावाचे आणखी एक ठळक उदाहरण असल्याचे ज्ञानदेव मांजरे यांनी म्हटले आहे.

## अकोला गावचे सुपुत्र जयदत्त जायभाय यांची

# भारतीय सैन्यात लेफ्टनंटपदी निवड

## पाथर्डी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा । इन्फंट्री शाखेत राजपत्रित वर्ग–१ म्हणून नियुक्ती

● **पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी तालुक्यातील अकोला येथील तरुण जयदत्त नामदेव जायभाय यांनी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए), खडकवासला तसेच इंडियन मिलिटरी अकॅडमी (आयएमए), देहरादून येथील कठोर आणि खडतर प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून भारतीय सैन्य दलाच्या इन्फंट्री शाखेत लेफ्टनंट (भारतीय आयोगप्राप्त अधिकारी – राजपत्रित वर्ग–१) म्हणून नियुक्ती मिळवली आहे. त्यांच्या या दैदिप्यमान यशामुळे अकोला गावासह संपूर्ण पाथर्डी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

दि. १३ जून २०२६ रोजी देहरादून येथे अत्यंत दिमाखदार वातावरणात पार पडलेल्या 'पासिंग आउट परेड' सोहळ्यात त्यांना भारतीय सैन्य दलात अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार त्यांच्या कुटुंबीयांसह अनेक मान्यवर ठरले.

ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, चिकाटी, शिस्त, कठोर परिश्रम आणि राष्ट्रसेवेची प्रबळ भावना यांच्या बळावर जयदत्त जायभाय यांनी हे यश संपादन केले आहे. भारतीय सैन्य दलात अधिकारी म्हणून मिळालेली ही नियुक्ती केवळ त्यांच्या कुटुंबासाठीच नव्हे, तर संपूर्ण परिसरासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.



लहानपणापासून देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या जयदत्त यांनी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी आणि इंडियन मिलिटरी अकॅडमीमधील कठोर प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करून आपल्या गुणवत्तेची आणि कर्तृत्वाची ठळक छाप उमटवली आहे. त्यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील तरुणांना संरक्षण दलात करिअर करण्यासाठी नवी प्रेरणा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

या यशानिमित्त लेफ्टनंट जयदत्त नामदेव जायभाय तसेच त्यांचे वडील ॲड. नामदेव जायभाय यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून सामाजिक, शैक्षणिक, राजकीय तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांचे कौतुक करून भावी सैनिकी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



शौर्य, समर्पण, शिस्त आणि राष्ट्रसेवा हाच खरा सैनिकाचा धर्म या विचाराला साजेसे यश संपादन करणाऱ्या लेफ्टनंट जयदत्त जायभाय यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. त्यांच्या भावी कारकिर्दीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्यांच्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# वीज चोरीचा पर्दाफाश करताना महावितरणच्या पथकावर हल्ला

## अंभोळ येथील घटना । अकोले पोलिसांत गुन्हा दाखल

● **अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील अंभोळ येथे वीज चोरी शोध मोहिमेदरम्यान महावितरणच्या पथकावर हल्ला झाल्याची गंभीर घटना घडली आहे. या प्रकरणी अकोले पोलिसांनी शासकीय कामात अडथळा आणणे तसेच वीज चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, महावितरण कंपनीच्या कोतूळ कक्ष कार्यालयांतर्गत पथक अंभोळ येथे अनधिकृत वीज वापर व वीज चोरीची तपासणी करण्यासाठी गेले होते. तपासणीदरम्यान वीज ग्राहक प्रभाकर बापूराव साबळे यांच्या घरातील वीज मीटरमध्ये घरातील वीज वापराची नोंद होऊ नये, या हेतूने मीटरची आऊटगोईंग वायर इनकमिंग वायरला जोडून वीज चोरी सुरू असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर महावितरणचे सहाय्यक अभियंता हर्षल मांडगे यांनी वीज चोरीबाबतची कारवाई सुरू केली.

यावेळी संबंधित वीज ग्राहकाचा मुलगा भागवत साबळे याने आर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत खोऱ्याच्या दांड्याने मारण्याचा प्रयत्न केला. तसेच उपस्थित वीज कर्मचाऱ्यांना मारहाण व धक्काबुक्की करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

घटनेनंतर घाबरलेल्या कर्मचाऱ्यांनी अकोले पोलीस ठाण्यात धाव घेतली. मात्र, काही राजकीय पुढाऱ्यांच्या हस्तक्षेपामुळे तब्बल तीन तासांहून अधिक काळ उलटूनही गुन्हा दाखल होण्यास विलंब होत असल्याने महावितरण कर्मचारी आक्रमक झाले.

या घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे विभागीय सचिव अमोल आभाळे यांनी कार्यकारी अभियंता, संगमनेर यांच्याशी संपर्क साधून घटनेचा निषेध व्यक्त केला. तसेच संबंधित आरोपीवर तात्काळ कठोर कारवाई न झाल्यास बेमुदत कामबंद आंदोलन छेडण्याचा इशारा देत आंदोलन सुरू करण्यात आले.

दरम्यान, कोतूळ व ब्राम्हणवाडा कक्षातील सर्व महावितरण कर्मचारी अकोले पोलीस ठाण्यात दाखल झाले असून आरोपीविरुद्ध तातडीने गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी त्यांनी लावून धरली.

> वीज ग्राहकांच्या सेवेसाठी अहोरात्र कर्तव्य बजावणारे महावितरणचे अभियंते, अधिकारी व कर्मचारी सध्या कंपनीवरील आर्थिक संकटामुळे थकीत वीजबिल वसुली मोहीम तसेच वीज चोरीविरोधी विशेष मोहीम राबवत आहेत. त्याअंतर्गत थकबाकीदार ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्यात येत आहे. या शासकीय कामात अडथळा आणून कर्मचाऱ्यांना शिवीगाळ, मारहाण व धक्काबुक्कीचे प्रकार घडत असल्याने अशा घटनांची गंभीर दखल घेऊन संबंधितांवर तात्काळ फौजदारी कारवाई करण्यात येत आहे.
>
> **– प्रदीप वट्टमवार,**
> कार्यकारी अभियंता,
> महावितरण, संगमनेर

राजकीय दबावाला न जुमानता पोलीस उपनिरीक्षक मोहन बोरसे यांनी सहाय्यक अभियंता हर्षल मांडगे यांच्या फिर्यादीवरून शासकीय कामात अडथळा आणणे तसेच वीज चोरीचा गुन्हा दाखल केला.